Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by

NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 22/05/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## थोर संस्कृत विद्वान विष्णू वामन बापट



विष्णू वामन बापट हे संस्कृत विद्वान, भाषांतरकार व शास्त्रसुधारक होते. त्यांचा जन्म २२ मे १८७१ रोजी रत्नागिरीतील धालवल येथे झाला. त्यांचे शिक्षण रामदुर्ग, शिरोळ आणि मिरज येथे इंग्रजी पाचवीपर्यंत झाले. त्यानंतर त्यांनी तारमास्तराच्या कामाचे ज्ञान मिळविले. निरनिराळ्या रेल्वे कार्यालयांतून नोकऱ्या केल्या. त्या करीत असतानाच संस्कृतच्या अभ्यासाची ओढ निर्माण झाल्यामुळे संस्कृत शिकले व वाई येथील प्रज्ञानंद सरस्वतींकडे त्यांनी वेदान्ताचे अध्ययन केले. अध्ययनकाळात चरितार्थासाठी वाईच्या मोदवृत्त छापखान्यात मुद्रितशोधकाची नोकरी केली. १९०३ ते १९१२ या काळात सिंध हैदराबाद येथील संस्कृत पाठशाळेचे मुख्याध्यापक म्हणून त्यांनी काम पाहिले. १९१२ साली पुण्यास येऊन ग्रंथप्रकाशनाचा व्यवसाय त्यांनी सुरू केला.

ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला (मासिक), आचार्य (पाक्षिक) आणि आचार्यकुल (मासिक) ह्यांसारखी नियतकालिके चालविली. संस्कृतातील बरेचसे प्राचीन तत्त्वज्ञान, साहित्य बापटांनी मराठीत आणले, ही त्यांची फार मोठी कामगिरी होय. गीता, उपनिषदे आणि ब्रह्मसूत्र या प्रस्थानत्रयीचा शांकरभाष्यानुसार परिचय त्यांनी मराठीतून घडविला. तसेच भारतीय तत्त्वज्ञानातील अद्वैतादी विविध दर्शनांवर मराठीतून लेखन केले. रामानुज, पूर्णप्रज्ञ, माहेश्वर, जैमिनी-पाणीनी या दर्शनांवर त्यांनी समतभेद लिहिले. तर जैन, बौद्ध, चार्वाक या दर्शनांचा परिचय घडविताना त्यांचे खंडनही केले. शंकराचार्यकृत आत्मबोध आणि अपरोक्षानुभूती ह्या ग्रंथांचे त्यांनी केलेले अनुवादही उल्लेखनीय आहेत. त्यांनी १९२५ मध्ये 'आचार्यकुल' या नावाची एक अध्यापन संस्थाही स्थापन केली होती. अशा या थोर शास्त्रसुधारकाचे २० डिसेंबर १९३३ रोजी निधन झाले.

Nashik Edition

May 22, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401